नियमीत फौ. ख. क्र. १३२/२०२४
सरकार -वि.- कृष्णा
नि.क्र. ११ खाली .

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - गणेश हिरामन रंगारी,
वय ३५ वर्षे, व्यवसाय – शेत मजुरी,
राहणार – धामनगाव विद्यामंदीर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>

१. घटना दि.०३.०९.२०२४ रोजी दुपारी ३.०० ते ४.०० वा. दरम्यान धामणगाव विद्यामंदीर येथे माझ्या घराच्या बाजुला घडली. त्यावेळी मी व माझा मित्र अमित खोब्रागडे माझ्या दुचाकीने निघालो असता माझ्यासमोर अमितने दुचाकी चालवत असताना अचानक क्लच सोडला त्यामुळे माझी गाडी वर उचकली त्यामुळे मी अमितला शिवीगाळ केली. त्यावेळी कृष्णा मेश्राम त्याच्या घरी असताना त्याला असे वाटले की, मी त्याला शिवीगाळ करीत आहे. कृष्णा मेश्राम माझ्या घराच्या बाजूला राहतो. माझ्या दुचाकीवर त्यावेळी आम्ही तीन जन होतो त्यावेळी तो तिथे आला व त्याने माझी कॉलर पकडली, गाडीवरुन खाली पाडले व दगडाने मारले. त्यामुळे माझ्या डोक्यातून रक्त येऊ लागले. माझ्या बरोबर असलेल्या दोघांनी त्याला पकडले बाजूला केले. तरी ही तो मला मारण्यासाठी वारंवार येत होता. त्यामुळे लोकांनी त्याला बाजूला केले व फिर्याद देण्याकरिता भिवापूरला आलो. आता मला दाखविलेली फिर्याद तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२** देण्यात येते. आता मला दाखविलेले छापील प्रथम खबर अहवाल तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१३** देण्यात येते. ज्या दगडाने मला मारले तो मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला पोलीसांनी जप्त केलेला सील बंद दगड मलाउघडून दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येते. मी आरोपीला ओळखतो. तो आज कोर्टात हजर आहे. पोलीसांनी मला उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय भिवापूर येथे पाठविले होते. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.
सर तपास संपला.

<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>

२. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत फिर्याद देण्यापूर्वीपासून आरोपी व माझे एकमेकाकडे येणे जाणे व बोलणे चालणे बंद आहे. मी आरोपीच्या घरासमोर राहतो. मी अविवाहीत आहे. आरोपीला दोन मुली व एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या पत्नीचे नाव मनिषा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या पत्नीचे माझ्याकडे व माझे तिच्याकडे येणे जाणे होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझे व आरोपीच्या पत्नीचे प्रेम संबंध जुळले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझे व आरोपीच्या पत्नीचे फोटो मी वायरल केले होते. हे मला माहीत नाही की, त्यानंतर आरोपीचे मुले त्याच्या पत्नीने तिच्या माहेरी पाठविले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा त्याची मुले आणण्याकरिता गेला असताना मी व आरोपीची पत्नी गायब झालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर गावामध्ये तंटामुक्तीची सभा झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या सभेमध्ये पोलीस पाटील प्रमोद गणविर व तंटामुक्ती अध्यक्ष मानिक चौधरी यांनी मला व आरोपीच्या पत्नीला बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तंटामुक्ती सभेमध्ये आरोपी त्याच्या पत्नीला म्हणाला की, तुला त्याच्यासोबत जायचे असल्यास जा तेव्हा तुम्ही आरोपीच्या पत्नीला तुमच्यासोबत ठेवण्यास तयार झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी मला म्हणाला की, तिनही मुलांना तु घेऊन जा. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी मुलांना ठेवण्यास नकार दिला होता व त्याच्या पत्नीला ठेवण्यास तयारी दर्शविली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तंटामुक्ती अध्यक्षांनी आरोपीच्या पत्नीला सांगितले की, तु मुलांना ठेवायचे असल्यास ठेव. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेपासून माझे आरोपीसोबत संबंध खराब आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रेम प्रकरणामध्ये आरोपीचा व्यत्यय येऊ नये म्हणून मी त्याला वारंवार शिवीगाळ करीत होतो. हे मला माहीत नाही की, आरोपी हा डोक्याला कमी आहे. मला दारु पिण्याचा शौक नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ वरील दगड संपूर्ण मुठ्ठीमध्ये बसतो. साक्षीदार सांगाते त्याच दगडाने मला मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्या दगडाने मारहाण होऊ शकत नाही. मला मारहाण झाल्यामुळे रक्ताने कपडे भरले होते व जमिनीवर सांडले होते. हे म्हणणे खरे

नाही की, त्यावेळी माझ्या मित्राचेही कपडे रक्ताने भरले होते. मी पोलीसांनी माझे रक्ताने भरलेले कपडे फिर्याद देताना दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, कुठलीही घटना घडली नसल्यामुळे मी रक्ताने भरलेले कपडे दिले नव्हते. मी पोलीसांना फिर्याद देताना "माझ्या दुचाकीवर त्यावेळी आम्ही तीन जन होतो त्यावेळी तो तिथे आला व त्याने माझी कॉलर पकडली, गाडीवरुन खाली पाडले"' ही बाब सांगितली होती तसे माझ्या फिर्यादीत का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना फिर्याद देताना "अमितने दुचाकी चालवत असताना अचानक क्लच सोडला त्यामुळे माझी गाडी वर उचकली त्यामुळे मी अमितला शिवीगाळ केली"' ही बाब सांगितली होती तसे माझ्या फिर्यादीत का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना फिर्याद देताना "माझ्या बरोबर असलेल्या दोघांनी त्याला पकडले बाजूला केले, तरी ही तो मला मारण्यासाठी वारंवार येत होता"' ही बाब सांगितली होती तसे माझ्या फिर्यादीत का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेली कुठलीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल अ सारखे दगड गावामध्ये बऱ्याच ठिकाणी असतात. असे काही घडले नव्हते की, क्लच दाबल्यामुळे गाडी उचकली व मी खाली पडलो होतो.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - २०.०६.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.